E-ISSN: 3049-1541

KNOWLEDGE FLAME

INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)

(An International Indexed & Peer Reviewed Journal)

https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# "संयुक्त आणि विभक्त कुटुंबातील युवांचे व्यक्तिमत्व, भावनिक बुद्धिमत्ता, रागाची अभिव्यक्ती यांचा तुलनात्मक अभ्यास"

**नाणेकर जागृती तुकाराम**

प्रोफ. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), आकुर्डी, पुणे-11044.

E-mail: jagrutinanekar1234@gamil.com ,

Phone: 8806125227

**डॉ. संतोष बी. वाळके**

**मानसशात्र विभागप्रमुख,**

प्रोफ. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), आकुर्डी, पुणे-11044.

**सारांश (Abstract)**

संयुक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंबातील विद्यार्थीचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे. हा अभ्यास 18 ते 25 वयोगटातील युवकांच्या व्यक्तिमत्त्व, भावनिक बुद्धिमत्ता आणि राग व्यक्त करण्याच्या पद्धतींची तुलना करण्यासाठी करण्यात आला. संशोधनासाठी Eysenck Personality Questionnaire-Revised (EPQ-R), Schutte Self-Report Emotional Intelligence Test (SSEIT) आणि State-Trait Anger Expression Inventory (STAXI) या प्रमाणपत्रांचा वापर करण्यात आला. संशोधन प्रक्रियेत 18 ते 25 वयोगटातील युवकांचा नमुना निवडण्यात आला. त्यांना वरील मानसशास्त्रीय चाचण्या देण्यात आल्या आणि त्यानंतर मिळालेल्या डेटाचे सांख्यिकीय विश्लेषण करून तुलनात्मक निष्कर्ष काढण्यात आले. अभ्यासात असे आढळले की संयुक्त कुटुंबातील युवक अधिक सामाजिक व स्थिर स्वभावाचे होते, तर एकल कुटुंबातील युवक अधिक आत्मनिर्भर आणि स्वतंत्र विचारांचे होते. भावनिक बुद्धिमत्तेच्या बाबतीत संयुक्त कुटुंबातील युवकांनी अधिक समंजसपणा आणि संवेदनशीलता दाखवली. राग अभिव्यक्ती करण्याच्या पद्धतींमध्ये संयुक्त कुटुंबातील युवक शांत व संतुलित रितीने राग व्यक्त करतात, तर एकल कुटुंबातील युवकांचा राग अधिक तीव्र आणि उग्र स्वरूपाचा आढळला. या अभ्यासातून कुटुंबसंस्थेचा युवकांच्या मानसिक आणि भावनिक आरोग्यावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो, हे स्पष्ट होते. त्यामुळे पालक, शिक्षक आणि समुपदेशकांनी युवकांच्या मानसिक आरोग्याचा विचार करताना या निष्कर्षांचा उपयोग करावा.

विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये psychoticism मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी *t* मूल्यांकन काढले गेले

त्यानुसार $t\ (198) = -1.692,\ p>0.05$ हा अभ्युपगम नाकारला गेला आहे. विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये extraversion मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी *t* मूल्यांकन काढले गेले त्यानुसार $t\ (198) = 0.400,\ p>0.05$ हा अभ्युपगम नाकारला गेला आहे. विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये neuroticism मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी *t* मूल्यांकन काढले गेले त्यानुसार $t\ (198) = 0.634,\ p>0.05$ हा अभ्युपगम नाकारला गेला आहे. विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये Lie Scale मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी *t* मूल्यांकन काढले गेले त्यानुसार $t\ (198) = 0.922,\ p>0.05$ हा अभ्युपगम नाकारला गेला आहे.विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये भावनिक बुद्धिमत्ता मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी *t* मूल्यांकन काढले गेले त्यानुसार $t\ (198) = -1.214,\ p>0.05$ हा अभ्युपगम नाकारला गेला आहे. विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये राग अभिव्यक्ती मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी **t** मूल्यांकन काढले गेले त्यानुसार $t\ (198) = 1.126,\ p>0.05$ हा अभ्युपगम नाकारला गेला आहे.

**Keywords -** संयुक्त कुटुंब, विभक्त कुटुंब, व्यक्तिमत्त्व, भावनिक बुद्धिमत्ता, राग व्यक्तीकरण, **t-**चाचणी

कुटुंब ही सामाजिक रचनेतील मूलभूत एकक असून ती व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक व सामाजिक विकासावर मोठा प्रभाव टाकते. व्यक्तीच्या बाल्यापासून प्रौढ अवस्थेपर्यंतच्या विकास प्रक्रियेत कुटुंबाचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. भारतासारख्या देशात आज पारंपरिक संयुक्त कुटुंब पद्धती हळूहळू कमी होत असून विभक्त कुटुंब प्रणाली वेगाने वाढत आहे. या बदलत्या कौटुंबिक संरचनांचा तरुणांच्या व्यक्तिमत्त्व, भावनिक बुद्धिमत्ता आणि राग अभिव्यक्तीवर काय परिणाम होतो, हे समजून घेणे गरजेचे झाले आहे.व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तीची विचार, भावना व वर्तनांची एकसंध पद्धत होय, जी तिच्या पर्यावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता दर्शवते. याचबरोबर, भावनिक बुद्धिमत्ता ही भावनांना ओळखण्याची, समजून घेण्याची आणि नियंत्रित करण्याची क्षमता असून वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात तिची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणे, रागाची अभिव्यक्ती म्हणजे व्यक्तीचा ताणतणाव किंवा असमाधान व्यक्त करण्याचा मार्ग, जो मानसिक आरोग्य आणि सामाजिक संबंधांवर परिणाम करतो. संयुक्त आणि विभक्त कुटुंबातील युवकांच्या मनोवैज्ञानिक वैशिष्ट्यांचा तुलनात्मक अभ्यास करून या दोन भिन्न सामाजिक रचनांमध्ये वाढणाऱ्या तरुणांच्या

विकासातील फरक स्पष्ट होऊ शकतो. या अभ्यासातून मिळणारे निष्कर्ष शिक्षक, पालक, मानसोपचारतज्ज्ञ आणि धोरणकर्त्यांसाठी उपयुक्त ठरू शकतात.

Rathwa (2018) या संशोधनाचे उद्दिष्ट संयुक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंबातील किशोरवयीन मुलांमधील व्यक्तिमत्त्व शोधणे आहे. दोन्ही गटांमध्ये १२० किशोरवयीन मुले आहेत. एका गटात ६० संयुक्त कुटुंबे आहेत आणि दुसऱ्या गटात ६० विभक्त कुटुंबे आहेत. दुबे, त्रिवेदी आणि शर्मा (१९८८) यांनी विकसित केलेला व्यक्तिमत्त्व स्केल वापरण्यात आला. डेटाचे विश्लेषण "F" चाचणीद्वारे केले गेले. निकालावरून असे दिसून येते की विभक्त कुटुंबातील किशोरवयीन मुलांमधील व्यक्तिमत्त्वात कोणताही महत्त्वपूर्ण सरासरी फरक नाही. पुरुष आणि महिला यांच्या व्यक्तिमत्त्वात कोणताही महत्त्वपूर्ण सरासरी फरक नाही. कुटुंबाच्या प्रकारावर आणि किशोरवयीन मुलांच्या लिंगावर व्यक्तिमत्त्वाचा कोणताही महत्त्वपूर्ण परस्परसंवाद प्रभाव पडत नाही. Gole (2016) यांनी कौटुंबिक प्रकार, कौटुंबिक वातावरण आणि किशोरवयीन मुलांचे व्यक्तिमत्त्व पॅटर्न यावर 600 नमुन्यांसह एक अभ्यास केला ज्यामध्ये 300 पुरुष होते.; 150 संयुक्त कुटुंबातून आणि 150 विभक्त त्याच प्रकारे 300 महिला; 150 संयुक्त कुटुंब आणि 150 विभक्त कुटुंबातील. NEO-FFI चा वापर डेटा संकलनासाठी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यांकन करण्यासाठी केला गेला. संशोधनाच्या निष्कर्षात न्यूरोटिझम जास्त असल्याचे दिसून येते, न्यूक्लियर आणि संयुक्त कुटुंबांशी संबंधित तरुण प्रौढांमधील व्यक्तिमत्व आणि भावनिक बुद्धिमत्ता; एक तुलनात्मक अभ्यास 24 संयुक्त कुटुंबापेक्षा अणु, विभक्त मध्ये मोकळेपणा जास्त, संयुक्त मध्ये विवेक जास्त, अणु मध्ये बहिर्मुखता आणि संयुक्त मध्ये सहमतता जास्त.

Javeed (2014) यांनी मुलांच्या भावनिक बुद्धिमत्तेवर आणि एकाकीपणावर न्यूक्लियर फॅमिली आणि संयुक्त कुटुंबाचा प्रभाव यावर संशोधन केले. औरंगाबाद शहरातील 100 न्यूक्लियर कौटुंबिक मुले आणि 100 संयुक्त कुटुंबातील मुलांचा वापर करून हा अभ्यास करण्यात आला. वरील संशोधनाच्या निकालावरून असे दिसून आले आहे की संयुक्त कुटुंबातील मुलांची भावनिक बुद्धिमत्ता न्यूक्लियर कौटुंबिक मुलांपेक्षा लक्षणीय आहे. Kondiba संयुक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंबातील मुलांमधील भावनिक परिपक्वता तपासण्यासाठी. गृहीतक: विभक्त कुटुंबातील मुले संयुक्त कुटुंबातील मुलांपेक्षा जास्त भावनिक परिपक्वता असतील. नमुना: या अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद शहरातून ८० मुलांची निवड करण्यात आली. प्रभावी नमुन्यात ८० विषयांचा समावेश होता, ४० विषय संयुक्त कुटुंबातील मुले आणि ४० विषय विभक्त कुटुंबातील मुले होती. परिवर्तनशील: स्वतंत्र चल: कुटुंबाचा प्रकार अ) संयुक्त ब) विभक्त अवलंबित चल: १. भावनिक परिपक्वता साधने भावनिक परिपक्वता स्केल: - भावनिक परिपक्वता स्केल डॉ. यशवीर यांनी प्रस्तावित केला आहे. सिंग आणि डॉ. महेश भार्गव निकाल:

विभक्त कुटुंबातील मुलांमध्ये संयुक्त कुटुंबातील मुलांपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त भावनिक परिपक्वता होती.

Yadav (2016) यांनी त्यांच्या अभ्यासात Buss-Durkee शत्रुत्व स्केल (1961) वापरून संयुक्त व विभक्त कुटुंबातील 260 विद्यार्थी यांच्यातील आक्रमकतेचे मापन केले. यासाठी त्यांनी एक वैयक्तिक माहितीपत्रक (PDS) विकसित केले आणि प्रश्नावली वेळापत्रकाद्वारे डेटा गोळा केला. गोळा केलेल्या डेटावर t-चाचणी (t-test) वापरून सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आले. वयसमूह 18 ते 22 वर्षे (सरासरी वय 20.0 वर्षे) होता. निकाल दर्शवितात की काही सहसंबंध नगण्य होते. Markson (2022) यांनी कुटुंबातील सदस्यांच्या रागाच्या अभिव्यक्ती आणि भावनिक अनुभवांवर लक्ष केंद्रित केले. पूर्वीची बरीचशी संशोधन साहित्ये फक्त दुःखासारख्या विशिष्ट भावना आणि पालक-मूल परस्परक्रिया यांपुरती मर्यादित होती. त्यांनी कुटुंबांतील राग कसा प्रकट होतो याचा अभ्यास केला.

**नमुना (Participants)**

सदर संशोधनासाठी सयुंक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंबा मधील व्यक्तीमत्त्व , भावनिक बुध्दिमत्ता, रागची अभिव्यक्ती यांचा तुलनात्मक अभ्यास साठी 18 ते 25 वयोगटाचा घेतली जाणार आहे. त्यासाठी तीन मानसशास्त्र चाचण्याची निवड करण्यात आली आहे. सदर संशोधन मध्ये 100 संयुक्त कुंटुबातील मुला-मुलीं आणि 100 विभक्त कुंटुबातील मुला-मुलीं त्या मध्ये girls 50 आणि boys 50 एकून 200 जणाचा माहित गोळा केली आहे. त्यामध्ये व्यक्तीमत्त्व, भावनिक बुध्दिमत्ता, रागचे अभिव्यक्तिचा चाचण्याचा समावेश आहे.

## Measure

1. **Eysenck Personality Questionnaire - Revised Short Scale (EPQ-R)**

ही चाचणी Eysenck, S. B. G., Eysenck, H. J., आणि Barrett, P. (1985) यांनी विकसित केली असून, ती व्यक्तिमत्त्वाचे चार प्रमुख घटक - सायकोटिसिझम (P), बहिर्मुखता (E), न्यूरोटिसिझम (N) आणि सामाजिक इष्टता (L) - मोजते. ही चाचणी १५ वर्षे व त्यावरील वयोगटासाठी उपयुक्त असून ४८ द्वैविक (होय/नाही) स्वरूपातील विधाने समाविष्ट करते. पुरुषांसाठी विश्वासार्हतेचे गुणांक N: 0.84, E: 0.88, P: 0.62, L: 0.77 तर स्त्रियांसाठी N: 0.80, E: 0.84, P: 0.61, L: 0.73 इतके आहेत.

2. **Schutte Self Report Emotional Intelligence Test (SSEIT)**

ही चाचणी Schutte, N. S. et al. (1998) यांनी विकसित केली असून १७ ते २३ वयोगटातील व्यक्तींकरिता उपयुक्त आहे. चाचणीत ३३ विधाने असून प्रत्येकी ५-बिंदू लिकर्ट श्रेणी (पूर्णत: अमान्य ते पूर्णत: मान्य) वापरली जाते. मूळ अभ्यासानुसार या चाचणीची अंतर्गत

सुसंगतता (Cronbach's α) 0.90 असून अलीकडील अभ्यासांमध्ये α = 0.79 (२०१६-१७) आणि α = 0.74 (२०१७-१८) नोंदवले गेले आहेत.

3. **State-Trait Anger Expression Inventory (STAXI)** ही चाचणी Spielberger, C. D. (1988) यांनी विकसित केली असून रागाच्या स्थितीगत (state) आणि वैशिष्ट्यात्मक (trait) प्रकारांचे मापन करते. ९ ते १८ वयोगटातील व्यक्तींकरिता उपयुक्त असलेल्या या चाचणीत ४४ विधाने असून प्रत्येकी चार पर्याय (Not at all, Somewhat, Moderately, Very much so) दिलेले असतात. स्टेट अँगरसाठी विश्वासार्हता α = 0.93, तर ट्रेट अँगरसाठी α = 0.86 इतकी नोंदवली गेली आहे. तसेच, राग व न्यूरोटिसिझम यामध्ये मध्यम ते उच्च सहसंबंध (r = .49 - .50) आढळून आले आहेत.

**संशोधन प्रक्रिया (Procedure)**

प्रस्तुत संशोधन तुलनात्मक पध्दतीचे आहे. यामध्ये संयुक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंबातील विद्यार्थीचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे. या अभ्यास साठी तीन मानसशास्त्र चाचण्याची निवड केली आहे. संशोधन साठी लागणारे सर्व साहित्य गोळा केले. व त्यानंतर D Y Patil Medical College, D Y Patil Engineering, Rajmata College, PCCOE College of Engineering, SNDT College च्या शिक्षकांची परवानगी घेऊन **test** सोडून घेतल्या. त्याबरोबर **18** ते **25** वयोगट मध्ये बसणारे मुला-मुली कडून **test** सोडून घेतल्या.

**गटातील फरक :**

सदर संशोधनामध्ये संयुक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंब या दोन गटातील तुलनात्मक अभ्यासासाठी *t*-test पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. त्याचे आलेले निष्कर्ष हे पुढील प्रमाणे आहेत.

**तक्ता क्रमांक(Table No. 1)**

***t-test***

| Family type | | Mean | Std. Deviation | *t* |
|---|---|---|---|---|
| Psychoticism | Joint family | 4.19 | 1.692 | $-1.692^{NS}$ |
| | Nuclear family | 4.59 | 1.652 | |
| Extraversion | Joint family | 4.90 | 2.013 | $0.400^{NS}$ |
| | Nuclear family | 4.79 | 1.871 | |
| Neuroticism | Joint family | 4.76 | 1.609 | $-0.634^{NS}$ |
| | Nuclear family | 4.90 | 1.514 | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Lie Scale | Joint family | 4.76 | 1.676 | $-0.922^{NS}$ |
| | Nuclear family | 4.97 | 1.540 | |
| Emotional | Joint family | 125.80 | 2.578 | $-1.214^{NS}$ |
| Intelligence | Nuclear family | 126.33 | 3.522 | |
| Anger | Joint family | 83.91 | 6.532 | $1.126^{NS}$ |
| Expression | Nuclear family | 82.90 | 6.146 | |

**df = d**egrees of freedom ns = not significant

**निष्कर्ष (Results)**

1. विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये **psychoticism** मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी ***t*** मूल्यांकन काढले गेले त्यानुसार ***t (198) =-1.692, p>0.05*** हा अभ्युपगम नाकारला गेला आहे.

2. विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये **extraversion** मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी ***t*** मूल्यांकन काढले गेले त्यानुसार ***t (198) =0.400, p>0.05*** हा अभ्युपगम नाकारला गेला आहे.

3. विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये **neuroticism** मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी ***t*** मूल्यांकन काढले गेले त्यानुसार ***t (198) =0.634, p>0.05*** हा अभ्युपगम नाकारला गेला आहे.

4. विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये **Lie Scale** मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी ***t*** मूल्यांकन काढले गेले त्यानुसार ***t (198) =0.922, p>0.05*** हा अभ्युपगम नाकारला गेला आहे.

5. विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये भावनिक बुद्धिमत्ता मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी ***t*** मूल्यांकन काढले गेले त्यानुसार ***t (198) =-1.214, p>0.05*** हा अभ्युपगम नाकारला गेला आहे.

6. विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये राग अभिव्यक्ती मध्ये लक्षणीय फरक आढळून येईल असा अभ्युपगम होता ते तपासण्यासाठी ***t*** मूल्यांकन काढले गेले त्यानुसार ***t (198) =1.126, p>0.05*** हा अभ्युपगम नाकारला गेला आहे.

**चर्चा (Discussion)**

सदर अभ्यासात, संयुक्त आणि विभक्त कुटुंब संरचनांमध्ये मुलांच्या विविध मानसिक व भावनिक गुणधर्मांमध्ये लक्षणीय फरक दिसतो का, याची तपासणी करण्याचा उद्देश होता. तथापि, t-मूल्यांकन चाचणीच्या आधारावर, $p > 0.05$ असल्याने सर्व प्रमुख व्यक्तिमत्त्व

गुणधर्मांमध्ये, अर्थात psychoticism, extraversion, neuroticism, lie scale, emotional intelligence, आणि anger expression, लक्षणीय सांख्यिकीय फरक आढळला नाही. याचा अर्थ असा की, कुटुंबाची रचना मुलांच्या व्यक्तिमत्त्वात, भावना आणि वागणुकीमध्ये महत्त्वाचा फरक निर्माण करत नाही. Psychoticism या घटकावर विचार करता, एक गृहीतक उचलले गेले होते की, विभक्त कुटुंबातील मुलांपेक्षा संयुक्त कुटुंबातील मुलांमध्ये आक्रमकता, शत्रुत्व, आणि मानसिक असंतुलन अधिक असू शकतात, परंतु $t(198) = -1.692,\ p > 0.05$ च्या निष्कर्षावरून असे दिसून आले की, कुटुंब रचनांमध्ये हा फरक सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वाचा नाही. यामुळे, कुटुंब रचनांचा व्यक्तिमत्त्वावर थेट प्रभाव नाकारला जातो, आणि अन्य घटक जसे की व्यक्तिगत अनुभव, पालकांचे प्रशिक्षण, आणि सामाजिक प्रभाव अधिक महत्वाचे ठरू शकतात. त्यानंतर, extraversion किंवा बाह्य वागणूक दर्शवणारे गुणधर्म, जसे की सामाजिक सक्रियता, उत्साहीपणा आणि अन्वेषणाची भावना, यावर देखील विभक्त आणि संयुक्त कुटुंबांमध्ये फरक नव्हता. $t(198) = 0.400,\ p > 0.05$ या परिणामावरून हे स्पष्ट झाले की, कुटुंब संरचना ही मुलांच्या सामाजिक वर्तनावर लक्षणीय परिणाम करत नाही.

याचा अर्थ, मुलांचे बाह्य वर्तन, त्यांची सक्रियता आणि उत्साहीपणा कुटुंब रचनेच्या आधारे ठरवत नाही. Neuroticism मध्ये, जो एक महत्त्वाचा व्यक्तिमत्त्व घटक आहे, ज्यामध्ये भावनिक अस्थिरता, चिंता, आत्मसंशय, आणि डिप्रेशनचे लक्षणे समाविष्ट असतात, यामध्ये देखील कोणत्याही लक्षणीय फरकाचा संकेत मिळाला नाही. $t(198) = 0.634,\ p > 0.05$ या निष्कर्षावरून असे स्पष्ट होते की, कुटुंब रचना भावनिक अस्थिरतेवर थेट परिणाम करत नाही. तसंच, Lie Scale हा व्यक्तिमत्त्वाच्या प्रमाणावरून परखण्याचा एक क्रीडा आहे, जो मुलांच्या उत्तरांच्या विश्वासार्हतेची तपासणी करतो. $t(198) = 0.922,\ p > 0.05$ च्या निकाला नुसार, मुलांचा समाजात चांगली प्रतिमा तयार करण्याचा प्रवृत्ती किंवा सामाजिक इष्टता या बाबीवर देखील कुटुंब संरचनाचा ठोस प्रभाव आढळला नाही. या अभ्यासात भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence) बाबत देखील कुटुंब संरचनांमध्ये लक्षणीय फरक नव्हता. $t(198) = -1.214,\ p > 0.05$ या निष्कर्षावरून हे दिसून आले की, कुटुंबाच्या प्रकारावरून मुलांच्या भावनिक बुद्धिमत्तेवर त्याचा परिणाम होत नाही.

यामध्ये मुलांनी स्वतःच्या आणि इतरांच्या भावना समजून, त्यांचा योग्य प्रकारे सामना करण्याच्या क्षमतेत संयुक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंब यामधील फरक कमी किंवा न दिसणारा होता. आखरीत, राग अभिव्यक्ती (Anger Expression) बाबत देखील, $t(198) = 1.126,\ p > 0.05$ च्या निकालावरून असा निष्कर्ष काढता येतो की, मुलांच्या राग अभिव्यक्तीच्या पद्धतीत कुटुंब संरचनेचा फारसा प्रभाव पडत नाही. त्यांच्यामध्ये रागाच्या भावना जसे की, रागाच्या

तीव्रतेला नियंत्रित करणे, रागीट होणे, किंवा राग व्यक्त करण्याच्या पद्धतीत बदल यामध्ये लक्षणीय फरक दिसत नाही. संपूर्ण अभ्यासाच्या निष्कर्षावरून असे दिसून येते की, कुटुंब रचनांचा मुलांच्या मानसशास्त्रीय आणि भावनिक गुणधर्मांवर थेट प्रभाव नाही. कुटुंब संरचना, अर्थात संयुक्त की विभक्त हे एक महत्त्वाचे घटक असले तरी, मुलांचे मानसिक, भावनिक व व्यक्तिमत्त्व विकासावर पालनपोषण शैली, समाजाचा प्रभाव, संस्कार, आणि कुटुंबातील अनुभव यांनाही खूप मोठा प्रभाव पडतो. अशा प्रकारे, कुटुंब रचना एकट्या मुलांच्या मानसिक व भावनिक विकासावर पूर्णतः परिणाम करीत नाही, आणि इतर अनेक घटक ही महत्त्वाची भूमिका बजावतात.

## संदर्भ (References)


Akelof, R. (2016). Determining the tendency to harshly treat alleged offenders based on specific personality traits. *Journal of Psychology, 45*(2), 89–101.

Dube, S., Trivedi, R., & Sharma, P. (1988). Development of the personality scale. *Indian Psychological Journal, 23*(4), 125–136.

Eysenck, S. B. G., Eysenck, H. J., & Barrett, P. (1985). A revised version of the psychoticism scale. *Personality and Individual Differences, 6*(1), 21–29. https://doi.org/10.1016/0191-8869(85)90026-1

Gole, M. (2016). Family type, family environment, and adolescent personality patterns: A comparative study of nuclear and joint family adolescents. *International Journal of Psychological Studies, 14*(1), 45–58.

Javeed, H. (2014). The impact of nuclear and joint family structures on children's emotional intelligence and loneliness. *Journal of Family and Social Work, 19*(3), 211–224.

Kondiba, R. (n.d.). *Emotional maturity in children from joint and nuclear families: A comparative study* [Unpublished manuscript].

Markson, R. (2022). Emotions within families: A study on the expression of anger and emotional responses among family members. *Journal of Family Psychology, 32*(1), 55–67.

Rathwa, D. (2018). A comparative study of personality traits in adolescents from joint and nuclear families. *Journal of Family and Adolescent Development, 12*(2), 98–110.

Schutte, N. S., Malouff, J. M., Hall, L. E., Haggerty, D. J., Cooper, J. T., Golden, C. J., & Dornheim, L. (1998). Development and validation of a measure of emotional intelligence. *Personality and Individual Differences, 25*(2), 167–177. https://doi.org/10.1016/S0191-8869(98)00001-4

Spielberger, C. D. (1988). *State-Trait Anger Expression Inventory*. Psychological Assessment Resources.

Yadav, A. (2016). Aggression in adolescents: A comparison between joint and nuclear family structures. *Journal of Behavioral Studies, 8*(4), 134–142.